# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२६**
**(सकाळी ११-०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक — १)**

(१) **सर्वश्री. रईस शेख, अमीन पटेल, अस्लम शेख, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. संजय मेश्राम, अबू आझमी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहरात पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथ विक्री अधिनियम २०१४) या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसणे, सदर कायदा लागू होऊन सुमारे १० वर्षे कालावधी झाल्यानंतरही एकसमान अंमलबजावणी अपूर्ण असणे, प्रभावीपणे मुंबई शहरात नगर विक्रेता समिती (Town Vending Committee) गठीत झालेली नसणे,तसेच कायद्याने बंधकारक असलेले प्रतिनिधी त्या समितीमध्ये नसणे, कलम ३ अंतर्गत अपेक्षित असलेले नियतकालिक सर्वेक्षण वेळेत व पारदर्शक पध्दतीने पूर्ण न करणे, मागिल सर्वेक्षण व परवाना नोंदणी असूनही पात्र पथ विक्रेत्यांना विक्री परवाना प्रमाणपत्र (Certificates of Vending) जारी न करणे, कलम ३८ अंतर्गत आवश्यक असलेली वैधता सर्वसमावेशकपणे कार्यान्वित न करणे, या वैधानिक त्रुटी असतानाही मुंबईतील विविध भागांमध्ये निष्कासन मोहिमा, रात्री उशिरा टाकले जाणारे छापे, मालाची जप्ती आणि दंड आकारणी केली जात असल्याचे निदर्शनास येणे, कायद्याची पूर्ण अंमलबजावणी न होता प्रशासकीय कारवाया सुरु राहिल्यामुळे मुंबईतील पथविक्रेते व त्यांच्या कुटुंबियांमध्ये मोठ्या प्रमाणावर भिती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होणे, नियमानुसार नगर विक्रेता समिती कार्यान्वित केली नसणे, सर्वेक्षण झालेल्या विक्रेता परवाना धारकांना विक्री प्रमाणपत्रे जारी न करणे, कलम ३८ अंतर्गत योजनेची अंमलबजावणी झालेली नसणे, पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथ विक्री अधिनियम २०१४) या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

रोटा/एचबी १२४२ (२,७००-०३-२०२६)-१

**(२) सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक शहरात अतिक्रमण ही अत्यंत गंभीर समस्या झालेली असणे, सदर समस्या अधिक गंभीर करण्यामध्ये नाशिक महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचा मोठा सहभाग असणे, त्र्यंबक रोड, सातपूर कॉलनी परिसरात अनेक खाद्यपदार्थ विक्रेते, फळविक्रेते, भाजीपाला विक्रेते व चिकन विक्रेत्यांनी राजरोसपणे रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे व्यवसाय सुरु केलेला असणे, उटंवाडी-त्रिमुर्ती चौकात वाढत असलेले अतिक्रमण, याबाबत अनेक तक्रारी करुनही त्याकडे संबंधित विभागाचे जाणीवपुर्वक होत असलेले दुर्लक्ष, अतिक्रमण विभागाकडून मनमानी पद्धतीने अतिक्रमण काढण्याची कारवाई होणे, अनेक प्रकरणात दोन नोटीसा होऊन देखील अतिक्रमण काढण्याची कारवाई केली न जाणे, अतिक्रमण काढण्यापूर्वी अतिक्रमण धारकांना पूर्वकल्पना दिली जाणे, त्यामुळे नागरिकांमध्ये अतिक्रमणाचे भय राहिलेले नसणे, अतिक्रमणाची कारवाई करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मागणी केली जाणे, काही खाजगी जागांवर नोटीसा न देता देखील कारवाई केली जाणे, यामुळे शहराला बकाल स्वरूप प्राप्त झाले असणे, यास्तव गेल्या दोन-तीन वर्षापासून अतिक्रमण विभागामार्फत केलेल्या कामकाजाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, विशेषत: प्रशासकीय कालावधीत केल्या गेलेल्या अतिक्रमणाची व प्रलंबित ठेवलेल्या अतिक्रमणांची चौकशी करण्याची आवश्यकता, शासनाचे सदर बाबींकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत राज्य शासनाच्या स्तरावर उच्चस्तरीय समिती स्थापन करून चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(३) कॅप्टन आर. सेल्वन, सर्वश्री. अबू आझमी, अनंत (बाळा) नर, श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्य शासनातर्फे अपात्र झोपडीधारकांना पात्र करून घेण्याकरीता अभय योजना राबवली जात असणे, सदर योजना एसआरए मार्फत योग्य पद्धतीने राबवली जात नसल्याने बहुतांश झोपडीधारकांना पात्र होण्याकरिता बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागत असणे, याचा फायदा घेऊन विकासक जाणीवपूर्वक नव्याने खरेदी केलेल्या झोपडीधारकांचे नाव पुरवणी परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट न करणे, नवीन खरेदी केलेल्या झोपडीधारकांचे नाव पुरवणी परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट करण्यापूर्वी प्रकल्प सुरू करण्यास परवानगी देण्यात येत असणे, त्याचबरोबर सायन येथील विविध प्रकल्पांचा पुनर्विकास रखडला असणे, यामध्ये साईसिटी संस्थेचा पुनर्विकास करण्याकरिता ४ वेळा निविदा काढून एकाही विकासकाने प्रक्रियेत भाग न घेणे, या परिस्थितीत स्थानिक रहिवाशी यांना विकासक नेमण्याची परवानगी मिळत नसणे, निर्मलनगर संस्थेमधील पात्र झोपडीधारकांना ताबापत्र मिळूनही एसआरएमार्फत सदनिका सील केली असणे, सदर पात्र

झोपडीधारकांच्या नावांची जाहिरात वर्तमानपत्रात जाहीर करूनही सदनिकेचा ताबा न मिळणे, निसर्ग संस्थेमधील विकासकाने १९ वर्षे होऊनही नियमांचे पालन न केल्याने इमारत पूर्ण असूनही भोगवटा प्रमाणपत्र (O.C.) मिळत नसल्याने सदनिकेचा ताबा मिळण्यास अडचणी येत असणे, त्यामुळे हे सर्व प्रकल्प मार्गी लागण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) श्री. जयंत पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सातारा जिल्ह्यातील धोम धरणाच्या कालव्यांची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदर कालव्यांना अनेक ठिकाणी खिंडार पडलेले असून सिंचनासाठी सोडले जाणारे पाणी मोठ्या प्रमाणात वाया जात असणे, पाटबंधारे विभागाकडून कालव्यांची दुरुस्ती, साफसफाई तसेच योग्य नियंत्रण होत नसल्याने पाणी गळतीमध्ये झालेली वाढ, तसेच पाटकऱ्याची मनमानी अद्याप सुरु असून शेतकऱ्यांना योग्य प्रमाणात पाणी मिळत नसणे, परिणामी शेती सिंचन प्रभावित होणे, पिकांचे नुकसान होणे, उत्पादन घट तसेच आर्थिक अडचणी निर्माण होत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, धोम धरणाच्या कालव्यांच्या दुरवस्थेबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर दुरुस्तीबाबत करावयाची कार्यवाही, याकरिता निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) सर्वश्री. दिपक केसरकर, निलेश राणे, शेखर निकम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा व काजू बागांमध्ये यावर्षी मोठ्या प्रमाणात मोहोर येणे, मात्र अवकाळी पाऊस, अचानक तापमानात झालेली घट, थंडीची लाट व बदलत्या हवामानामुळे मोहोर करपणे, फळधारणा न होणे व लहान फळांची मोठ्या प्रमाणात गळती होणे. या संदर्भात सिंधुदुर्ग जिल्हयाचे पालकमंत्री यांनी मंत्रालयात बैठक घेऊन आंबा व काजू फळपिकांबाबत क्षेत्रीय पाहणी अहवाल सादर करण्यास निदेश दिले असणे, दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२६ ते २१ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान कृषी विभाग व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांच्या तज्ज्ञांनी संयुक्त पाहणी करणे, त्यानुसार चालू हंगामात आंबा व काजू उत्पादनात सरासरीच्या तुलनेत जवळपास ८५ ते ९० टक्क्यांपेक्षा अधिक घट होण्याची शक्यता असणे, आंबा व काजू हे जिल्ह्यातील प्रमुख नगदी पीक असून हजारो शेतकरी कुटुंबांचे उपजीविकेचे मुख्य साधन असणे, उत्पादनात झालेली मोठी घट शेतकऱ्यांना आर्थिक संकटात नेणारी असणे, सदरहू बाब तातडीची व सार्वजनिक महत्वाची असल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) सर्वश्री. भास्कर जाधव, मोहन मते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात तेरखेडा गावासह परिसरात फटाके बनविण्याचे कारखाने मोठ्या प्रमाणात असणे, या कारखान्यांमध्ये अधून मधून स्फोटांच्या घटना घडत असून अनेक कामगारांना प्राण गमवावे लागले असणे, तर अनेकांना गंभीर जखमा होऊन अपंगत्व आलेले असणे, असे असतानाही सबंधित फटाका कारखाना मालकांकडून कामगारांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपकरणे पुरविण्यात येत नसल्याने होणाऱ्या स्फोटांमुळे कामगारांच्या जिवितास निर्माण झालेला धोका, सदर फटाके कारखान्यांच्या गलथान कारभारामुळे दिनांक ६ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास गोजवाडा शिवारातील गट क्र. ५६१ मध्ये बालाजी फायर वर्क या कारखान्यात कच्चा माल ठेवण्यात आलेल्या ठिकाणी स्फोट होऊन कारखान्याचे रोड पूर्णपणे उध्वस्त होणे, या ठिकाणी ४० किलो पेक्षा जास्त मिक्स केलेली स्फोटाची दारू आढळून येणे, स्फोट कशामुळे झाला हे अद्यापही स्पष्ट न होणे, विशेषत: तेरखेडा, खामकरवाडी शिवारात दिनांक ३१ जानेवारी, २०२६ रोजी फटाका कारखान्यात प्रचंड स्फोट झाला असतांना त्याचा अहवाल शासनाला देण्यात आलेला नसणे, सदर बाबतीत छोट्या-मोठ्या कारखानदारांनी कामगारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपकरणे व साधनसामग्री खरेदी केलेली नसणे, सबंधित कामगारांना धोका निर्माण होत असल्याने याबाबत राज्य शासनाच्या अखत्यारीतील प्राधिकाऱ्यांना निवेदन देऊनही केवळ व्यवसायिकांचा बचाव करण्यासाठीच्या प्रयत्नामुळे सर्वसामान्य कामगार वर्गात निर्माण झालेली तीव्र चिडीची व संतापाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) सर्वश्री. राजेश विटेकर, मुरजी पटेल, अमोल पाटील, संजय गायकवाड, चंद्रकांत निंबाजी पाटील, राजु तोडसाम, रोहित पवार, अमोल खताळ, सुधीर मुनगंटीवार, प्रविण दटके, प्रताप अडसड, करण देवतळे, मोहन मते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"एटापल्ली (जि. गडचिरोली) तालुक्यातील मौ. आलदंडी टोला या गावात प्रसुतीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा स्थानिक रुग्णालयांची कोणतीही सुविधा नसल्यामुळे आशा संतोष किरंगा या ९ महिन्यांच्या गर्भवती महिलेस दिनांक ९ जानेवारी, २०२६ रोजी आपल्या पोटातील बाळास वाचविण्यासाठी डॉक्टरांकडे पतीसह वैद्यकीय उपचारार्थ सहा किलोमीटरची पायपीट करावी लागल्याचे निदर्शनास येणे, सदर गर्भवती महिलेस वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे अगोदर तिच्या बाळाचा पोटातच मृत्यु झाल्याचे व त्यानंतर काही वेळातच गर्भवती महिलेचाही मृत्यू झाल्याची घटना घडणे, शवविच्छेदन व मृतांच्या प्रमाणपत्रासाठी मृतदेह एटापल्ली ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले मात्र तिथे स्त्रीरोगतज्ज्ञ नसल्याचे कारण पुढे करत त्यांना पुन्हा ४० किलोमीटर अहेरीला अतिरिक्त अतंर पार करावे लागणे, गडचिरोलीसारख्या “स्टील हब” म्हणून नावारुपास येत असलेल्या परंतु

अपुऱ्या पायाभूत सुविधेचे विदारक रुप पहावे लागल्याचा प्रसंग गावकरी, नातेवाईक व हितसंबंधितांवर आला असल्याचे निदर्शनास येणे, या घटनेची चौकशी करुन चौकशीतील निष्कर्षानुसार संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, सदर प्रकरण गडचिरोलीसह राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील मूलभूत आरोग्य सुविधांच्या गंभीर अभावाचे भयानक उदाहरण ठरते, यासाठी राज्यातील अशा घटना रोखण्यासाठी व आदिवासी दुर्गम भागात जीवनावश्यक सोयी-सुविधा पुरवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**तीन : शासकीय विधेयके :**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१) (क) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम व अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

एचबी १२४२ (२,७००-०३-२०२६)-२

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, रामदास मसराम, हेमंत ओगले व अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**चार : (गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, मनोज कायंदे, प्रशांत बंब, दिपक केसरकर, चेतन तुपे, सुरेश धस, तानाजी सावंत, शेखर निकम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रमेश बोरनारे, प्रताप पाटील-चिखलीकर, चैनसुख संचेती, राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रकाश भारसाकळे, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. उमेश यावलकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, बबनराव लोणीकर, विलास तरे, सुनिल शेळके, संभाजी निलंगेकर-पाटील, अतुल भातखळकर, संजय उपाध्याय, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. चंद्रदिप नरके, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री मंगेश चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके, मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, गोपीचंद पडळकर, किशोर पाटील, राजकुमार बडोले, सुरेश भोळे, शांताराम मोरे, नारायण कुचे, प्रकाश सुर्वे, हरिष पिंपळे, निलेश राणे, राजू तोडसाम, तुकाराम काते, अभिमन्यू पवार, अशोक पाटील, देवराव भोंगळे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, योगेश सागर, समीर कुणावार, सुहास कांदे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री संजय गायकवाड, सत्यजित देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेंद्र थोरवे, सुमित वानखेडे, महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री संतोष बांगर, सुनिल कांबळे, राजेश बकाने, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री दिलीप लांडे, किशोर जोरगेवार, महेश शिंदे, राजेश पवार, आमश्या पाडवी, संतोष दानवे, हिकमत उढाण, राम कदम, संजय केळकर, मिहिर कोटेचा, केवलराम काळे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, राणाजगजितसिंह पाटील, अमोल खताळ, ॲड. राहुल कुल, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, समाधान आवताडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सुहास बाबर, राजेश पाडवी, विलास भुमरे, काशिराम पावरा, राजेश मोरे, दिलीप बोरसे, विठ्ठल लंघे, प्रताप अडसड, किरण सामंत, श्रीमती सई डहाके, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री मोहन मते,**

**राजेंद्र यड्रावकर-पाटील, कृष्णा खोपडे, शरद सोनवणे, विनोद अग्रवाल, शिवाजी पाटील, जितेश अंतापुरकर, किर्तीकुमार भांगडीया, सर्वश्रीमती अनुराधा चव्हाण, नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, संजय पुराम, विजय रहांगडाले, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, करण देवतळे, भीमराव केराम, तुषार राठोड, तानाजी मुटकुळे, अनुपभैय्या अग्रवाल, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री श्याम खोडे, प्रविण तायडे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, देवेंद्र कोठे, विजय देशमुख, हेमंत रासने, भिमराव तापकीर, अमल महाडिक, सुरेश खाडे, राहुल आवाडे, मनोज घोरपडे, सुधीर गाडगीळ, महेश लांडगे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri **२०२६**' ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्य प्राण्यांच्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**पाच : (गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, संदिप क्षिरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनिल राऊत,**

**अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"माहे जानेवारी, २०२५ आणि जानेवारी, २०२६ मध्ये दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० लाख कोटी आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उद्योग राज्यात उभारला न जाणे, राज्यातील टाटा एअरबस, वेदांता फॉक्सकॉन, सॅफ्रेन, बल्कड्रग पार्क, पाणबुडी इत्यादी अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा, परिणामी राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद असणे, राज्यात विविध योजनांचा निधी रखडलेला असून त्यामुळे राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व लाभार्थी यांच्यावर त्याचा थेट परिणाम होत असणे, नियोजन विभागांतर्गत विविध योजनांचा निधी रखडल्याने कंत्राटदार व कामगार यांच्यावर आर्थिक ताण निर्माण होत असणे, परिणामी राज्यातील विकास कामांचा वेग मंदावलेला असणे, राज्यातील विकास योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, राज्यातील नगरपालिका महानगरपालिकेचा कारभार मागील अनेक वर्षापासून प्रशासकाच्या मार्फत चालू असल्याने प्रशासनावर नसलेला वचक त्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार आणि नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विविध मेट्रो प्रकल्पांत झालेल्या आणि होत असलेल्या निकृष्ट बांधकामामुळे होत असलेले अपघात, MMRDA, CIDCO यासारख्या महामंडळाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती, विविध शहरांचे रखडलेले हद्दवाढीचे प्रस्ताव, विकास आराखड्याचे प्रस्ताव यामुळे कुंठित झालेला शहरांचा विकास, अमृत योजनेंतर्गत निधी नसल्यामुळे रखडलेले पाणीपुरवठा व इतर विकास कामांचे प्रकल्प, पुणे विमानतळा शेजारुन जाणारा रस्ता भविष्यात बंद होण्याची शक्यता असल्याने ५०९ चौक ते कलवड मार्गे धानोरी-लोहगाव रस्त्याला जोडणारा कलम २०५ अंतर्गतचा रस्ता प्रलंबित असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : (गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री. सुनिल प्रभू, रोहित पवार, अमीन पटेल, दिलीप सोपल, संदिप क्षिरसागर, अस्लम शेख, अजय चौधरी, बापूसाहेब पठारे, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, श्री रोहित पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, उत्तमराव जानकर, अमित झनक, सुनिल राऊत, नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले,**

**हारुन खान, रामदास मसराम, महेश सावंत, अनिल मांगुळकर, प्रविण स्वामी, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात २०२६ पासून 'मोफत उपचार' सेवा बंद होऊन केसपेपर व शस्त्रक्रियांसाठी शुल्क आकारणी सुरू झाल्याने गरीब रुग्णांचे हाल होत असणे, त्यातच औषधांचा, विशेषतः प्रतिजैविके आणि मनोरुग्णांच्या गोळ्यांचा १.५ वर्षांपासून असलेला तुटवडा चिंतेचा विषय असणे, १,४०० हून अधिक डॉक्टरांची रिक्त पदे आणि भूलतज्ज्ञांच्या अभावामुळे ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना शेजारील राज्यांत उपचारार्थ जावे लागत असणे, अनेक ग्रामीण रुग्णालयांची गळकी छते, अस्वच्छता आणि फायर एनओसीचा अभाव यामुळे रुग्णांची सुरक्षा धोक्यात आली असणे, राज्यातील औषधी पुरवठ्यामध्ये होत असलेली अनियमितता, प्राथमिक आरोग्यकेंद्र, उपकेंद्र यांची झालेली बिकट परिस्थिती, काही ठराविक औषधांसाठी खरेदी होणे, १०८ वरील रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध न होणे, पुण्यातील बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय (ससून रुग्णालय), नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि मुंबईतील ग्रँट मेडीकल कॉलेज (जे.जे.रुग्णालय) या तीन शासकीय महाविद्यालयांना स्वायत्ततेचा दर्जा देण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ०८ ऑगस्ट, २०२५ रोजी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांना दिलेल्या सूचना, यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने अद्यापपर्यंत समितीची स्थापना न करणे, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये शासनाच्या अखत्यारीत असून विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेणे व पदवी देण्याची जबाबदारी महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ (नाशिक) यांच्याकडे असणे, स्वायतत्ता दिल्यास दोन्ही बाबी एकाच यंत्रणेकडे राहणार असणे, फलटण (जि.सातारा) येथील शासकीय रुग्णालयातील एका महिला डॉक्टरनी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये हॉटेलमध्ये गळफास घेऊन केलेली आत्महत्या, आत्महत्या करण्यापूर्वी महिला डॉक्टरांनी दोन आरोपींची उघड केलेली नावे, यासंदर्भात एसआयटी आणि न्यायिक चौकशी करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, दोन्ही चौकशी त्वरीत पूर्ण करुन आरोपीस कडक शिक्षा देण्याची आवश्यकता, राज्यात विशेषत: ग्रामीण भागातील महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने करावयाची उपाययोजना,तसेच राज्यातील रस्त्यांची स्थितीही दयनीय असणे, ग्रामीण भागातील रस्त्यांची निधी अभावी झालेली दुरवस्था, शहरी भागात काँक्रीटीकरणाच्या कामांमुळे वाहतूक कोंडी वाढली असून घोडबंदर रस्ता अपघातांचा सापळा बनला असणे, निकृष्ट डांबरीकरण, अवजड वाहतूक आणि विविध विभागांमधील समन्वयाअभावी नवीन रस्तेही लवकर खराब होत असणे, यामुळे नागरिकांना मणक्याचे आजार जडत असून इंधन आणि वाहनांच्या दुरुस्तीवर मोठा खर्च होत असणे, मुंबई - पुणे एक्सप्रेसवेवर ३० तास वाहतूक ठप्प होणे व अन्न-पाण्याविना नागरिकांचे अतोनात हाल होणे, राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मोठ्या

प्रमाणावर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने अध्यापन कार्यावर परिणाम होत असणे, शासनाने कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरती पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेणे, याला शिक्षक संघटना व विविध संघटनांकडून तीव्र विरोध होत असणे, कंत्राटी भरतीमुळे शिक्षकांना नोकरीची हमी, वेतनातील समता व सेवा स्थैर्य मिळत नसणे, त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नसणे, गुणवत्ता पुर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी कंत्राटी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्याऐवजी कायमस्वरुपी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(दुपारी २-०० वाजता)**

**सात : मुख्यमंत्री : सन २०२६-२०२७ चा अर्थसंकल्प सादर करतील.**

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ५ मार्च, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.